## नियमित दिवाणी दावा क्र. २२३/१९७५ मध्ये निशाणी क्र. ३३५ कडील अर्जावर आदेश

१) वादी क्र. ४ केसू येसू वाघमारे, वादी क्र. ५ विष्णु केरु वाघमारे, वादी क्र. ६ बाबु यशवंत वाघमारे, वादी क्र. ७ अशोक दादू वाघमारे, वादी क्र. ११ बापू ज्ञानू वाघमारे व वादी क्र. १४ आबा ज्ञानू वाघमारे व प्रतिवादी क्र. ६ बाळकाबाई दादू वाघमारे, प्रतिवादी क्र. ७ शिवा दादू वाघमारे, प्रतिवादी क्र. ९ विश्वास दादू वाघमारे, प्रतिवादी क्र. १२ गंगाबाई मारुती वाघमारे, प्रतिवादी क्र. १७ आनंदा गणू वाघमारे व प्रतिवादी क्र. १८ सुखदेव आण्णा वाघमारे यांची नावे पुन्हा रेकॉर्डवर घेण्यास परवानगी मिळण्याकरीता वादींतर्फे प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२) वादींनी प्रस्तुत अर्जात असे कथन केले आहे की, वादी क्र. १, १३, १५ व १६ व्यतिरिक्त इतर वादींची नावे व तसेच प्रतिवादी क्र. ७, ८, १० व ११ या प्रतिवादींची नावे दाव्यातून कमी करण्याबाबत वादींनी निशाणी क्र. १६६ कडे अर्ज दिला होता. सदर अर्जातील मागणीच्या अनुषंगाने न्यायालयाने केवळ प्रतिवादी क्र. ७, ८, १० व ११ या प्रतिवादींची नावे दाव्यातून कमी करण्यास परवानगी दिली होती. परंतु, प्रतिवादी क्र. ७, ८, १० व ११ या प्रतिवादींची नावे कमी करण्याऐवजी वादींच्या अनावधानाने वादी क्र. ४ केसू येसू वाघमारे, वादी क्र. ५ विष्णु केरु वाघमारे, वादी क्र. ६ बाबु यशवंत वाघमारे, वादी क्र. ७ अशोक दादू वाघमारे, वादी क्र. ११ बापू ज्ञानू वाघमारे व वादी क्र. १४ आबा ज्ञानू वाघमारे व प्रतिवादी क्र. ६ बाळकाबाई दादू वाघमारे, प्रतिवादी क्र. ७ शिवा दादू वाघमारे, प्रतिवादी क्र. ९ विश्वास दादू वाघमारे, प्रतिवादी क्र. १२ गंगाबाई मारुती वाघमारे, प्रतिवादी क्र. १७ आनंदा गणू वाघमारे व प्रतिवादी क्र. १८ सुखदेव आण्णा वाघमारे यांची नावे कमी केली आहेत.

३) प्रतिवादी क्र. २ च्या वारसांतर्फे प्रस्तुत अर्जास दाखल केलेल्या निशाणी क्र. ३३७ कडील म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, वादी क्र. ४ ते ६ व ११ व १४ यांच्याविरुद्ध दावा अबेट झाल्याचा आदेश दिनांक १३/१२/१९८८ रोजी पारीत झाला आहे. वादी या दाव्याचे काम या ना त्या कारणाने अकारण लांबवत आहेत. त्यामुळे वादीचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा.

४) प्रस्तुत अर्जाच्या कामी वादींच्या व प्रतिवादी क्र. २क ते २ई यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादींतर्फे निशाणी क्र. १६६ कडे असा अर्ज दाखल केला होता की, वादी क्र. १, १३, १५, १६ व्यतिरिक्त इतर सर्व वादींची नावे दाव्यातून कमी करण्यात यावी व तसेच प्रतिवादी क्र. ४, ५, ६, ९, १२, १३, १४, १५, १७ ते १९ यांची नावे दाव्यातून कमी करण्यात यावीत. न्यायालयाने निशाणी क्र. १६६ कडील अर्जावर दिनांक १३/०२/२००७ रोजी आदेश पारीत केला व सदर आदेशानुसार केवळ प्रतिवादी क्र. ७, ८, १० व ११ यांची नावे दाव्यातून वगळण्यास परवानगी दिलेली आहे. असे असताना वादींनी या अर्जामध्ये नमूद केलेल्या वादी व प्रतिवादींची नावे वादपत्राच्या टायटल क्लॉजमधून कमी केली आहेत. वादींनी या अर्जामध्ये नमूद केलेल्या वादी व प्रतिवादींची नावे पुन्हा अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळण्याची विनंती केली आहे. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादींनी निशाणी क्र. ८२ कडील यादीसोबत वादी क्र. ४ केसू येसू वाघमारे यांचे मृत्यु प्रमाणपत्र दाखल केले आहे. वादी क्र. ४ केसू येसू वाघमारे यांचे मृत्यु प्रमाणपत्र निशाणी क्र. ८६ कडे आहे. तसेच वादींनी निशाणी

क्र. ८२ कडील यादीसोबत वादी क्र. ५ विष्णु केरू वाघमारे यांचे मृत्यु प्रमाणपत्र दाखल केले आहे. वादी क्र. ५ विष्णु केरू वाघमारे यांचे मृत्यु प्रमाणपत्र निशाणी क्र. ८७ कडे आहे. तसेच रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादी क्र. ७ श्री अशोक दादू वाघमारे हे मयत झाले असल्याने निशाणी क्र. १ वरील दि. २५/११/२०२५ रोजीच्या आदेशानुसार प्रस्तुतचा दावा वादी क्र. ७ अशोक दादू वाघमारे यांच्याविरुद्ध अबेट करण्यात आला आहे. तसेच निशाणी क्र. ८२ कडील यादीसोबत वादी क्र. ११ बापू ज्ञानू वाघमारे यांचे मृत्यु प्रमाणपत्र दाखल केले आहे. वादी क्र. ११ बापू ज्ञानू वाघमारे यांचे मृत्यु प्रमाणपत्र निशाणी क्र. ८८ कडे आहे. तसेच निशाणी क्र. ८२ कडील यादीसोबत वादी क्र. १४ आबा ज्ञानू वाघमारे यांचे मृत्यु प्रमाणपत्र दाखल केले आहे. वादी क्र. १४ आबा ज्ञानू वाघमारे यांचे मृत्यु प्रमाणपत्र निशाणी क्र. ८९ कडे आहे. तसेच निशाणी क्र. १३० कडील यादीसोबत अनु. क्र. ३ कडे प्रतिवादी क्र. ६ बाळकाबाई दादू वाघमारे यांचे मृत्यु प्रमाणपत्र दाखल केले आहे. तसेच निशाणी क्र. ८२ कडील यादीसोबत प्रतिवादी क्र. ७ शिवा दादू वाघमारे यांचे मृत्यु प्रमाणपत्र दाखल केले आहे. प्रतिवादी क्र. ७ शिवा दादू वाघमारे यांचे मृत्यु प्रमाणपत्र निशाणी क्र. ८४ कडे आहे. तसेच निशाणी क्र. ३३९ कडील यादीसोबत प्रतिवादी क्र. १७ आनंदा गणू वाघमारे यांचे मृत्यु प्रमाणपत्र दाखल केले आहे.

६) रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादी क्र. ४, ५, ११ व १४ व तसेच प्रतिवादी क्र. ६, ७ व १७ हे मयत झाल्यानंतर वादींनी त्यांचे वारस अभिलेखावर घेण्याबाबत विहित मुदतीमध्ये कोणताही अर्ज दाखल केलेला नाही. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता क्र. २२, नियम ३, उपनियम २ मधील तरतुदीनुसार प्रस्तुतचा दावा त्यांच्याविरुद्ध आपोआप अबेट झाला आहे. प्रस्तुतचा दावा वादी क्र. ४, ५,

११ व १४ व तसेच प्रतिवादी क्र. ६, ७ व १७ यांच्याविरुद्ध आपोआप अबेट झाला असल्याने माझ्या मते सदर वादी व प्रतिवादींची नावे पुन्हा अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्याचा प्रश्न उपस्थीत होत नाही.

७) वादी क्र. ६ बाबू यशवंत वाघमारे व प्रतिवादी क्र. ९ विश्वास दादू वाघमारे व प्रतिवादी क्र. १२ गंगूबाई मारुती वाघमारे व प्रतिवादी क्र. १८ सुखदेव आण्णा वाघमारे यांची नावे वादपत्राच्या टायटल क्लॉजमधून कमी करण्यास न्यायालयाने कोणतीही परवानगी दिलेली नसताना वादींनी सदर प्रतिवादींची नावे अभिलेखावरुन कमी केली असल्याने माझ्या मते सदर वादी क्र. ६ बाबू यशवंत वाघमारे व प्रतिवादी क्र. ९ विश्वास दादू वाघमारे व प्रतिवादी क्र. १२ गंगूबाई मारुती वाघमारे व प्रतिवादी क्र. १८ सुखदेव आण्णा वाघमारे यांची नावे पुन्हा अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळण्याची विनंती समर्थनीय आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१) प्रस्तुत अर्ज खालीलप्रमाणे अंशत: मंजूर करण्यात येतो.

२) वादी क्र. ६ बाबू यशवंत वाघमारे व प्रतिवादी क्र. ९ विश्वास दादू वाघमारे व प्रतिवादी क्र. १२ गंगूबाई मारुती वाघमारे व प्रतिवादी क्र. १८ सुखदेव आण्णा वाघमारे यांची नावे पुन्हा अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळण्याची वादींची प्रस्तुत अर्जातील विनंती मंजूर करण्यात येते.

३) दिवाणी प्रक्रिया संहिता क्र. २२, नियम ३, उपनियम २ मधील तरतुदीनुसार प्रस्तुतचा दावा वादी क्र. ४, ५, ११ व

१४ व तसेच प्रतिवादी क्र. ६, ७ व १७ यांच्याविरुद्ध आपोआप अबेट झाला असल्याने त्यांच्याविरुद्ध निशाणी क्र. १ वर अबेटमेंटचा आदेश पारीत करण्यात येतो.

४) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2026.01.28 16:45:08 +0530

(पां. लिं. घुले)

दिनांकः– २८/०१/२०२६ २ रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.